ePaper

**विधिमंडळाचे आज विशेष अधिवेशन; ओबीसी आरक्षणाला धक्का नाही, मुख्यमंत्र्यांची ग्वाही!**



| वर्ष - 7 | अंक - 274 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 20 फेब्रुवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत


- पवार-पाटील संघर्ष पुन्हा पेटला!
- नौदलाचे महत्त्व जाणणारे राजे
- निरुपमही भाजपाच्या वाटेवर?
- राजकोटमध्ये 'यशस्वी'चे द्विशतक!


# "प्रधानमंत्री आवास"ला सोडतीची प्रतीक्षा!

## ‘पीएमआरडीए’ला मुहूर्त मिळेना: वाल्हेकरवाडीतील प्रकल्पाकडे लाभार्थींचे लक्ष

**। पिंपरी । महाईन्यूज** पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) वाल्हेकरवाडी गृहप्रकल्पात आतापर्यंत ३६ कुटुंबांना घरांचे ताबे देण्यात आले आहेत. तर, एकूण ११५ जणांनी त्यासाठी पूर्ण पैसे भरले आहेत. दरम्यान, या गृहप्रकल्पातील शिल्लक राहणारी घरे आणि पेठ क्रमांक १२ मधील शिल्लक घरांसाठी पुढील काही दिवसांमध्ये सोडत काढण्याचे नियोजन आहे.




> वाल्हेकरवाडी गृहप्रकल्पात आतापर्यंत ३६ नागरिकांना घरांचे ताबे देण्यात आले आहेत. या गृहप्रकल्पातील तसेच पेठ क्रमांक १२ मधील गृहप्रकल्पात शिल्लक राहिलेल्या सदनिकांसाठी पुन्हा नव्याने सोडत काढण्यात येणार आहे. पुढील १५ दिवसांत ही सोडत काढण्याचे नियोजन आहे.
>
> – प्रभाकर वसईकर, जनसंपर्क अधिकारी तथा कार्यकारी अभियंता

वाल्हेकरवाडी, पेठ क्रमांक ३० व ३२ येथे पीएमआरडीएच्या वतीने ७९२ घरांचा गृहप्रकल्प साकारला आहे. या गृहप्रकल्पात ३७८ वन रुम किचन आणि ४९४ वन बीएचके सदनिका आहेत. हा गृहप्रकल्प २०१६ मध्येच मंजूर झाला. त्याच्या कामाची मुदत सप्टेंबर २०१९ पर्यंत होती. मात्र, मुदतीत हा प्रकल्प पूर्ण न झाल्याने ठेकेदाराला चार वेळा मुदतवाढ देण्यात आली. दरम्यान, या गृहप्रकल्पातील सर्व सदनिकांसाठी सोडत काढण्यात आली, त्यातील २२० घरांसाठी अर्ज आले. शिल्लक राहिलेल्या घरांसाठी पुढील काही दिवसांमध्ये सोडत काढण्यात येणार आहे. प्रधानमंत्री आवास योजनेमधील पेठ क्रमांक १२ येथे आर्थिक दुर्बल घटक आणि अल्प उत्पन्न गटातील नागरिकांसाठी गृहप्रकल्प उभारला आहे. या गृहप्रकल्पात एकूण ४ हजार ८८३ घरे उभारण्यात आली आहेत. आर्थिक दुर्बल गटासाठी ३३१७ तर, अल्प उत्पन्न गटासाठी १५६६ सदनिका आहेत. या गृहप्रकल्पात अल्प उत्पन्न गटांसाठी असलेल्या सर्व घरांचे वाटप अद्याप झालेले नाही. येथील शिल्लक राहिलेल्या सदनिकांसाठी पुन्हा नव्याने येत्या १५ दिवसांमध्ये सोडत काढण्यात येणार असल्याची माहिती प्रशासकीय सूत्रांनी दिली.

# शिवजयंतीनिमित्त निगडीत अश्वारोहण प्रात्यक्षिक!

## विधायक कार्यक्रम : शिक्षण प्रसारक मंडळींच्या विद्यार्थ्यांना पर्वणी

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।** शिक्षण प्रसारक मंडळींच्या यमुना नगर, निगडी येथील शाळेत शिवजयंती निमित्त सोमवारी चित्तथरारक अश्वारोहण प्रात्यक्षिके सादर करण्यात आली..



### मातांनी व शिक्षकांनी जिजाऊ होणे गरजेचे

छत्रपती शिवाजी महाराज यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून विद्यार्थी जीवनातच विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांचे गुण आत्मसात केले पाहिजेत. तसेच भावी पिढी व समाज सुसंस्कृत बनवण्यासाठी तसेच प्रत्येकाच्या घरामध्ये शिवाजी महाराज जन्माला यावे असे वाटत असेल तर आताच्या प्रत्येक मातांनी व शिक्षकांनी जिजाऊ होणे गरजेचे आहे, मार्गदर्शन पराग ठाकूर यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना करण्यात आले.

शाळेच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि परिसरातील नागरिकांसाठी विविध सामाजिक, शैक्षणिक, अध्यात्मिक उपक्रमांचे आयोजन शाळा समितीचे अध्यक्ष अॅड. दामोदर भंडारी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहेत. त्या अंतर्गत अश्वारोहण प्रात्यक्षिके विद्यार्थ्यांना दाखवण्यात आली. तत्पूर्वी शि. प्र. मंडळी नियामक मंडळ सदस्य पराग ठाकूर यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी मराठी व इंग्रजी माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी लाठी-काठी, ढोल ताशा यांचे प्रात्यक्षिके सादर केली. शाहीर चैतन्य जोशी आणि शोभा जोशी यांनी शिवाजी महाराजांच्या कर्तुत्वाचा पोवाडा सादर केला त्याला ढोलकीची साथ उद्धव गुरव यांनी दिली.

शाळा समितीचे अध्यक्ष अॅड. दामोदर भंडारी, मुख्याध्यापिका ज्योती बक्षी, लीना वर्तक, उमा घोळे, मुख्याध्यापक रविंद्र मुंगसे, मुख्याध्यापिका सविता बिराजदार आणि शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

सूत्रसंचालन शितल महांकाळे, प्रार्थना रमा जोशी, स्नेहल देशपांडे यांनी गायली, आभार मीनल बोकील यांनी मानले.

# पवार-पाटील संघर्ष पुन्हा पेटला!

## तिसरी पिढी समोरासमोर, काय आहे वादाचा इतिहास?

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पवार-पाटील वाद पुन्हा पेटण्याची शक्यता आहे. हर्षवर्धन पाटील यांच्या कन्या अंकिता पाटील यांनी थेट उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर निशाणा साधला आहे.त्यांनी आमची फसवणूक केली, आमच्या पाठीत खंजीर खुपसला, मागच्या तिन्ही वेळेस त्यांनी शब्द देऊन फिरवला, त्यामुळे यावेळी जो कोणी उमेदवार असेल ते आमचं विधानसभेला काम करणार असतील तर लोकसभेला आम्ही त्यांच काम करू, असं अंकिता पाटील म्हणाल्या आहेत.**






सध्या अजित पवार आणि हर्षवर्धन पाटील हे महायुतीमध्ये आहेत. मात्र, पवार-पाटील वाद हा सर्वश्रूत आहे. या दोन घराण्यांमधील वाद हा आत्ताचा नाही तर शरद पवार आणि शंकरराव पाटलांपासूनचा आहे. त्यामुळे या दोन्ही घराण्याचा राजकीय इतिहास नेमका काय? इंदापुरमधला दोन्ही घराण्याचा वाद काय आणि याचा महायुतीवर कसा हे आपण जाणून घेऊया.पाटील घराणं इंदापुर मधलं मोठं राजकीय घराणं. इंदापुर हा बारामती लोकसभेचा भाग. आणि बारामतीत कोणाचा शिक्का चालतो हे काही नव्यानं सांगायला नको.तर शंकरराव पाटील हे काँग्रेसचे मातब्बर नेते. 1980 मध्ये ते बारामतीचे खासदार म्हणून लोकसभेवर गेले. दरम्यान १९८४ साली शरद पवारांनी शंकरराव पाटलांचा पराभव केला. त्यावेळी समाजवादी काँग्रेस होतं. पण त्यानंतर १९८५ ला शरद पवारांनी लोकसभेचा राजीनामा दिला आणि पोटनिवडणूक लागली . पुन्हा काँग्रेसनं शंकरराव पाटलांनी संधी दिली आणि त्यांच्याविरोधात जनता पक्षाचे संभाजीराव काकडे होते. पण या निवडणूकीत शरद पवारांनी शंकरराव पाटलांऐवजी संभाजीराव काकडेंना पाठिंबा दिला. त्यानंतर १९८९ साली पक्षानं त्यांना पुन्हा संधी दिली. हा मतदारसंघ काँग्रेसचा आणि शंकरराव पाटलांचा चांगलाच समर्थक होता. त्यामुळे १९९१ सालच्या लोकसभेवेळीही काँग्रेसमधून शंकरराव पाटलांचे नाव समोर येत होतं. पण यावेळी शरद पवारांनी हस्तक्षेप केला आणि पाटलांच तिकीट कापण्यात आल्याचं बोललं जातं. आणि यावेळी संधी मिळाली ती अजित पवारांना. तिथुनच पवार विरुद्ध पाटील घराण्याचा वाद सुरु झाला.१९९४ साली हर्षवर्धन पाटलांना पुणे जिल्हा परिषद लढवायची होती. पण यावेळी हस्तक्षेप केला अजित पवारांनी. आणि काँग्रेसनं पाटलांचं तिकीट नाकारलं. पाटलांच्या डोक्यात याचा राग होता. तेव्हा काँग्रेसविरोधात अपक्ष उभं राहून हर्षवर्धन पाटील जिल्हा परिषद निवडणूकीत विजयी झाले.त्यानंतर हर्षवर्धन पाटील आमदारकीच्या मैदानात उतरले. काँग्रेसकडून त्यांना निवडणूक लढवायची होती. पण काँग्रेसनं तिकीट नाकारलं त्यामुळे पाटलांनी अपक्ष निवडणूक लढवली आणि जिंकूनही आले. त्यानंतर पाटलांनी २ वेळा म्हणजे 1999, २००४. साली अपक्ष म्हणूनच निवडणूक लढवली आणि जिंकलीही. पण या दरम्यान काँग्रेसचा बालेकिल्ला असणारा इंदापुर भाग पक्षापासून दूर जात असल्याचं बघून पक्षानं हर्षवर्धन पाटलांना २००९ साली उमेदवारी दिला आणि पाटील आमदार म्हणून निवडूण आले.पण यातंच संघर्ष सुरु झाला तो अजित पवार आणि हर्षवर्धन पाटलांचा. २०१४ आणि २०१९ साली अजित पवारांनी हर्षवर्धन पाटलांच्या विरोधात दत्ता भरणे यांच्या पाठिमागे ताकद लावली आणि हर्षवर्धन पाटील यांचा पराभव केला.

### लोकांच्या तरुणांच्या गाठीभेटी

एकप्रकारे अजित पवारांनी इंदापुरच्या जागेवर आपलाच ताबा सांगितला. २०१९ साली अजित पवारांनी इंदापुरात केलेलं भाषण चांगलंच गाजलं होत. ज्यात अजित पवार म्हणाले होते की, वाट्टेल ते झालं तरी इंदापुरची जागा राष्ट्रवादीची सोडली जाणार नाही. भले आघाडी नाही झाली तरी बेहत्तर हा अजित पवारचा शब्द आहे.'आता पवार- पाटील घराण्याच्या या वादात तिसरी पिढी सुद्धा उतरलीये. ती म्हणजे अंकिता पाटील आणि राजवर्धन पाटील. काही दिवसांपासून अंकिता पाटील या मैदानात सक्रिय झाल्यात. बारामती लोकसभेला त्या मैदानात उतरणार अशी चर्चाही होती. निर्धार... बारामती भाजपमय करण्याचा! ही त्यांची सोशल मिडीया पोस्टही चांगलीच चर्चेत आली होती. बारामती मतदारसंघात त्या फिरताना आणि लोकांच्या तरुणांच्या गाठीभेटी घेताना त्या पहायला मिळाल्या होत्या.

---

# अजित पवारांचे लोकसभेसाठी भावनिक आवाहन!

## बारामतीत शिवजयंतीला सुप्रिया सुळेंच्या प्रचाराचा नारळ फुटला!

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अजित पवार यांनी सलग दोनवेळा बारामती लोकसभेसाठी भावनिक आवाहन केल्यानंतर आता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून सुद्धा बारामती खासदार सुप्रिया सुळे यांचा प्रचार सुरू करण्यात आला आहे.**

आज (19 फेब्रुवारी) छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीचा मूहुर्त साधत महाविकास आघाडीकडून सुप्रिया सुळेंचा प्रचार सुरू करण्यात आला.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडल्यानंतर पक्ष व चिन्ह उपमुख्यमंत्री अजित पवार गटाकडे गेलं आहे. या पार्श्वभूमीवर बारामती लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीत काय निकाल लागेल? याकडे महाराष्ट्रासह देशाचे लक्ष आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी लोकसभेला माझ्या विचाराचा उमेदवार निवडून नाही दिला तर मी विधानसभा लढवणार नसल्याचे वक्तव्य केले होते. असे असतानाच विद्यमान खासदार सुप्रिया सुळे यांच्या प्रचारार्थ लोकसभा निवडणुकीपूर्वच बारामतीत प्रचाराचे बिगुल वाजले आहे. दुसरीकडे, घरातील



व्यक्ती माझ्याविरुद्ध लढली तर काय हरकत नसल्याचे म्हटले आहे. त्या आज बोलताना म्हणाल्या की, माझं काम बघा, माझ्यावर भ्रष्टाचार कधीच आरोप झाला नाही. मी मुख्यमंत्री होण्याचा विषय येतो कुठे? मी आजपर्यंत राष्ट्रवादी काँग्रेसकडे बारामती लोकसभा तिकीट मागितले आहे. लोकशाही मत मांडण्याचा अधिकार असून विरोधक दिलदार असला पाहिजे. वैचारिक लढाई असल्यास घरातील व्यक्ती माझ्याविरुद्ध लढली तरी काय हरकत नाही. अजित पवार यांनी सेल्फीवरून केलेल्या टीकेवरून सुप्रिया सुळे यांनी प्रत्युत्तर दिले. सगळे आई वडील म्हणतात की मुलांना सांगितलं आहे फॉर्म भरून सेल्फी काढून पाठवायला. रेल्वे स्टेशन, शाळा, सगळीकडे. प्रधानमंत्री सांगतात सेल्फी काढा. एखादा सेल्फी काढून व्यक्ती खुश होते, तो आनंद वेगळाच असतो, असा टोला त्यांनी अजित पवारांना लगावला. दरम्यान, सुप्रिया सुळे आणि शरद पवारांनी जुन्या जाणत्या नेत्यांच्या भेटीगाठी घेण्यास सुरुवात केली आहे. शरद पवारांनी बारामतीत पृथ्वीराज जाचक यांची भेट घेतली.

### शरद पवारांच्या भेटीगाठी सुरु

दुसरीकडे, घरातील व्यक्ती माझ्याविरुद्ध लढली तर काय हरकत नसल्याचे म्हटले आहे. त्या आज बोलताना म्हणाल्या की, माझं काम बघा, माझ्यावर भ्रष्टाचार कधीच आरोप झाला नाही. मी मुख्यमंत्री होण्याचा विषय येतो कुठे? मी आजपर्यंत राष्ट्रवादी काँग्रेसकडे बारामती लोकसभा तिकीट मागितले आहे. लोकशाही मत मांडण्याचा अधिकार असून विरोधक दिलदार असला पाहिजे. वैचारिक लढाई असल्यास घरातील व्यक्ती माझ्याविरुद्ध लढली तरी काय हरकत नाही.

## अजित पवारांची तयारी अन् अढळराव पाटलांचा दावा

# शिरुरमध्ये महायुतीत होणार 'बारी'!

### पक्षश्रेष्ठींची डोकेदुखी : उमेदवारीवर शिवसेना, राष्ट्रवादीचा दावा

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिरुर लोकसभेच्या जागेवर अजित पवार यांची राष्ट्रवादी आणि एकनाथ शिंदे यांची शिवसेना या दोन पक्षांत रस्सीखेच सुरु आहे. "जागा आमचीच आहे, आम्ही निवडून येणार, म्हणून कोणीही दावा करु नये" असा थेट इशारा शिरुर लोकसभेचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी दिला आहे. तर राष्ट्रवादीच्या अधिवेशनात अजित पवार यांनी शिरुरसह चार जागांवर दावा करत तयारीही सुरु केली आहे. त्यामुळे शिरूर लोकसभेची जागा कोणाला मिळणार याबाबत मोठी चुरस निर्माण झाली आहे.**




सेना केसरी कुस्ती स्पर्धांचे आयोजन शहर प्रमुख प्रमोद नाना भानगिरेंच्या वतीने मोहम्मद वाडी येथे करण्यात आलं होतं. काल रात्री कुस्तीचा थरारक सामना देखील रंगला आणि महेंद्र गायकवाड विजेता झाला. दरम्यान या स्पर्धेला आमदार भरत शेठ गोगावले आणि शिरूरचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी शिवाजीराव आढळराव पाटील यांनी पत्रकारासोबत संवाद साधला.

पार्थ पवार यांच्या नावाची चर्चा...

राष्ट्रवादी काँग्रेसच्या अधिवेशनात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी लोकसभेच्या चार जागांवर आपला दावा केला होता. यामध्ये बारामती, शिरुर, सातारा, रायगड या चार जागा लढवण्यासाठी आपण आग्रही असल्याचं अजित पवार म्हणाले होते. त्यानंतर शिरूर लोकसभेसाठी त्यांनी तयारीही सुरू केली आहे. शिरूर लोकसभा मतदारांघामध्ये येणाऱ्या पाचपैकी चार विधानसभा मतदारसंघातील आमदारांचा अजित पवारांना पाठिंबा आहे. म्हणून अजित पवार यांनी शिरुरमधून पार्थ पवार यांना मैदानात उतरवणार असल्याची चर्चा आहे.



### "तू कसा निवडून येतो बघतोच..."

शिरूर लोकसभेचे विद्यमान खासदार शरद पवार गटाचे अमोल कोल्हे यांना अजित पवारांनी थेट इशारा दिला आहे. अजित पवार यांनी आपल्या खास शैलीत "तू कसा निवडून येतो" असं कोल्हेना आव्हानही दिलं आहे. दरम्यान कोल्हे यांनी अजित पवारांच्या धमकीला न जुमानता, आपण शरद पवारांसोबत असल्याचं म्हणत, अजित पवारांनाही प्रत्युत्तर दिलं आहे. त्यामुळे ही निवडणूक शरद पवार विरुद्ध अजित पवार अशी रंगली आहे. त्यासोबत अजित पवार यांनी आव्हान दिल्यामुळे ती दादांसाठी प्रचंड प्रतिष्ठेची बनली आहे. त्यामुळे अजित पवार ही जागा लढवणार असल्याची चर्चा आहे. पण आढळराव पाटील यांच्या वक्तव्यामुळे शिरुर लोकसभेची जागा अजित पवारांना युती सरकारमधून मिळेल का? हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.


---

## शिवविचार तरुणांच्या नसानसांत भिनले पाहिजे!

### तुषार कामठे : राष्ट्रवादी शरद पवार गटातर्फे शिवजयंती उत्साहात

। पिंपरी। प्रतिनिधी : महाईन्यूज

**सुजलाम सुफलाम असं स्वराज्य निर्माण करणारे आपले छत्रपती शिवराय आणि असंख्य मावळ्यांच्या बलिदानाने आपल्या सर्वांना मिळालेला आपला अभेद्य पुरोगामी महाराष्ट्र आज मनुवादी सत्ताधाऱ्यांच्या हातात अडकला आहे. मनुवादी विचारांनी आंधळं झालेलं राज्यशासन व केंद्रशासन आपला हा शिवरायांचा पुरोगामी महाराष्ट्र गिळंकृत केल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे छत्रपती शिवरायांची जयंती केवळ एक जल्लोषपूर्ण उत्सव म्हणून नव्हे तर महाराजांचे विचार व संस्कार प्रत्येकाने आपल्या नसानसांत भिनवणे गरजेचे आहे, अशा भावना राष्ट्रवादी शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी व्यक्त केल्या.**



अखंड पुरोगामी महाराष्ट्राचे आराध्य दैवत, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने पिंपरी चिंचवड शहरात मोठ्या जल्लोषात विविध उपक्रम व कार्यक्रम राबविण्यात आले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) पिंपरी चिंचवड शहर यांच्या वतीने आज शहरभरात विविध ठिकाणी आयोजित कार्यक्रमांना भेटी देऊन छत्रपती शिवाजी महाराजांना मानवंदना देण्यात आली.

यावेळी भोसरी, लांडेवाडी, पिंपरी, एच. ए. कॉलनी पिंपरी, रहाटणी, जिजामाता हॉस्पिटल पिंपरी, पिंपरी गाव, डांगे चौक चिंचवड, फुगेवाडी आदी ठिकाणी जाऊन छत्रपती शिवरायांना मोठ्या जल्लोषपूर्ण वातावरणात अभिवादन करण्यात आले. यावेळी शहराध्यक्ष तुषार कामठे, कार्याध्यक्ष देवेंद्र तायडे, माजी नगरसेवक गणेश भोंडवे, सुलक्षणा शिलवंत, सागर चिंचवडे, विशाल जाधव, विनोद धुमाळ, गणेश काळे, प्रतीक जम, सागर वाघमारे, आशिष तायडे, लकी गालफडे तसेच शहरभरातील विविध ठिकाणी कार्यकर्ते, पदाधिकारी व शिवप्रेमी नागरिक महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

तुषार कामठे म्हणाले की, छत्रपती शिवरायांच्या विचारांनीच आपण या मनुवादी राक्षसी शासनाचा विरोध करून त्यांना पराजित करू शकतो. आणि या आणीबाणीच्या लढाई मध्ये जाचक शासनाला धूळ चारण्यासाठी देशाच्या राजकारणातील सर्वोच्च अनुभवी मानबिंदु असलेले आदरणीय शरदचंद्र पवार साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पिंपरी चिंचवडचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व असंख्य जनसमुदाय कटिबद्ध आहोत.

### राज्याच्या गृहमंत्र्यांनी राजीनामा द्यावा : सुलक्षणा शिलवंत-धर

माजी नगरसेविका सुलक्षणा शिलवंत धर यांनी यावेळी आजच पुण्यात खराडी येथे पार्किंगच्या वादातून गाडी पेटवत असताना बाजूला उभ्या असलेल्या एका महिला भगिणीला गावगुंडांनी पेट्रोल टाकून पेटवल्याच्या संतापजनक घटनेचा जाहीर निषेध व्यक्त करत आरोपींवर कठोरात कठोर कारवाईची मागणी केली. त्याचबरोबर राज्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यास सपशेल फेल ठरलेल्या गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेची नैतिक जबाबदारी घरून तात्काळ राजीनामा द्यावा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने केली. जिजाऊ, सावित्री, रमाईच्या संस्कारांनी घडलेल्या महाराष्ट्रात भाजपच्या मनुवादी शासनाला अजीबात थारा दिला जाणार नाही.. आशा शब्दांत शिलवंत यांनी सत्ताधाऱ्यांचा निषेध केला.

# नौदलाचे महत्त्व जाणणारे राजे



## भूमिका

**छत्रपती शिवाजी महाराजांनी सुसज्ज अशा नौदलाची (आरमार) केलेली उभारणी हे त्यांचे फार मोठे कार्य आहे. सिद्दी, ब्रिटिश आणि पोर्तुगीज यांना शह देण्यासाठी त्यांनी योग्य ठिकाणी सागरी किल्ले उभारले. छोट्या-मोठ्या नौका, जहाजांची बांधणी केली. तो काळ असा होता की, शिवाजी महाराजांच्या प्रबळ नौदलाचा ताफा समोरून जात असताना पोर्तुगीजांच्या नौदलाने कोणतीही हालचाल केली नाही.**

ब्रिटिशांनी तर कान्होजी आंग्रे यांच्याकडे समुद्रातून मालाची ने-आण करण्यासाठी अखेरपर्यंत कर भरला.छत्रपती शिवाजीराजांचे नाव घेताच विजापूरच्या आदिलशाहीशी आणि मुघलांशी त्यांनी दिलेल्या लढ्याची आठवण होते. किंबहुना छत्रपतींच्या त्याच संघर्षाकडे संपूर्ण लक्ष केंद्रित केले जाते. छत्रपती शिवरायांनी आणखी अनेक अवघड गोष्टी साध्य करून दाखविल्या. शिवरायांनी उभारलेले आधुनिक नौदल (आरमार) आणि जहाज बांधणी उद्योगाचे त्यांनी केलेले पुनरुज्जीवन ही त्यापैकीच एक गोष्ट होय. गुजरातमधील लोथल येथे प्राचीन बंदर आणि जहाज बांधणीची जी जागा आढळून आली आहे, ती इसवी सनाच्या एक हजार वर्षे मागे घेऊन जाते. जहाज बांधणीच्या कलेत भारतीय लोक प्राचीन काळापासून निपुण आणि अग्रेसर होते, हे यावरून लक्षात येते. भरुच, कल्याण, चौल



आणि सोपोर येथील बंदरे संपूर्ण मध्यपूर्व आशियात त्याकाळी प्रसिद्ध होती; परंतु समुद्रमार्गे होणाऱ्या व्यापारातील भारतीयांचे प्रमाण आणि जहाजांची संख्याही चौदाव्या शतकानंतर कमी होत गेली. उत्तरेकडून भारतावर मुस्लिम सुलतानांनी केलेल्या स्वाऱ्या हे त्याचे प्रमुख कारण होते. भारतीयांनी भूमी गमावल्यानंतर सागरी व्यापार आणि जहाजांची संख्या कमी झाली आणि ही पोकळी नंतर अरबांनी भरून काढली. अरबस्तानातून येणाऱ्या व्यापाऱ्यांच्या वसाहती लवकरच भारताच्या पश्चिम तटावरील बहुतांश महत्त्वाच्या बंदरांजवळ उभ्या राहू लागल्या. अशा काळात सागरी शक्तीची जाणीव असलेले जे मोजके राज्यकर्ते त्याकाळी झाले, त्यापैकी शिवाजी महाराज हे एक होत. त्यांनी दौलतखान आणि मयंक भंडारी यांची नौदलाचे संयुक्त प्रमुख म्हणून नियुक्ती केली. लढाऊ नाविक दलाला पाठबळ देण्यासाठी अनेक सागरी किल्ले बांधले. मुंबईपासून 150 किलोमीटर दक्षिणेला महाराजांनी मुख्य नाविक तळ उभारला. ही जागा पोर्तुगीज, ब्रिटिश आणि सिद्दीच्या नौदल तळांपासून सुरक्षित अंतरावर होती. मालवणपासून दोन किलोमीटर पाण्यात असलेल्या खडकावर उभारलेला हाच तो सिंधुदुर्ग किल्ला होय. 10 नोव्हेंबर 1664 रोजी या किल्ल्याच्या कामाला सुरुवात झाली आणि 1667 मध्ये किल्ला बांधून तयार झाला. स्थानिक मच्छिमारांना शिवाजी महाराजांनी नौदलात भरती करून घेतले. त्यांना सढळहस्ते निधी दिला. त्यानंतरच्या काही वर्षांत एकंदर 58 किल्ले शिवरायांनी वापरात आणले. विजयदुर्ग आणि अलिबागजवळील कुलाबा हे त्यातील महत्त्वाचे किल्ले होत. फेब—ुवारी 1665 मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी नाविक दलाच्या ताकदीची चाचणी घेण्याचे ठरविले. दोन मोठ्या जहाजांसह 88 नौकांच्या ताफ्यासह चार हजारांचे सैन्य घेऊन मराठ्यांच्या नौदलाने बसरूर या बंदरावर हल्ला चढविला. हा ताफा बसरूरकडे निघाला असताना गोव्याजवळ पोर्तुगीजांच्या नौदलातील सैनिकांनी पाहिला; परंतु प्रबळ असे मराठा नौदल पाहून पोर्तुगीजांनी शहाणपणाने या ताफ्यापासून दूरच राहणे पसंत केले. 1680 पर्यंत मराठा नौदल खूपच शक्तिशाली बनले होते. मराठा नौदलाकडे त्याकाळी 300 टन वहन क्षमता असलेली 45 मोठी जहाजे होती, तर 150 छोट्या नौका आणि सुमारे 1100 गलबते या ताफ्यात होती. ब्रिटिश सिद्दी हा नावालाच विजापूरच्या सुलतानाचा मांडलिक होता; परंतु जेव्हा त्याला मराठ्यांकडून धोका जाणवला, तेव्हा त्याने सुरतच्या मुघल शासकाची मदत मागितली. सुरतमध्ये ब्रिटिशांचे व्यापारी हितसंबंध असल्यामुळे ते मुघलांशी चांगले संबंध ठेवू इच्छित होते. या परिस्थितीचा सिद्दीने पुरेपूर फायदा घेतला आणि सागरी ताकदीचा आधार घेऊन मराठ्यांच्या ताब्यातील अनेक इलाख्यांवर हल्ले केले.

## संपादकीय »

# संदेशखालीतील मोगलाई

***राजकारणाचे गुन्हेगारीकरण रोखण्याचे आव्हान किती जटिल नि व्यापक आहे, याची कल्पना संदेशखालीतील घटनेने येते.***

एखाद्या अगदी छोट्या गावखेड्यातील गावगुंडाला स्थानिक राजकारणासाठी सत्ताधारी पक्ष पाठबळ पुरवत असेल, तर त्याच्या दहशतीचे पडसाद थेट राष्ट्रीय पातळीवरील राजकारणात कसे उमटतात, याचा नमुनाच गेले महिनाभर पश्चिम बंगालमध्ये जे काही सुरू आहे, त्यामुळे बघावयास मिळाला आहे. संदेशखाली नावाचा २४ उत्तर परगाणा जिल्ह्यातील हा एक छोटेखानी इलाखा. खरे तर त्याचे नाव-गावही राष्ट्रीय पातळीवरील पक्षांना ठाऊक असण्याचे कारण नाही. मात्र, गेल्या महिनाभरात तेथील शहाजहान शेख या गावगुंडाच्या थैमानामुळे हे गाव थेट राष्ट्रीय नकाशावर जाऊन पोहोचले आहे. शिवाय, राष्ट्रीय महिला आयोग, अनुसुचित जाती-जमाती आयोग आणि सर्वोच्च न्यायालय यांना तेथील गुंडगिरीची दखल घेणे भाग पडले आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या मालकीच्या स्थावर मत्तांचा आकार वाढीव दर्शवला आणि त्या मत्तांच्या फुगवलेल्या मूल्यांच्या प्रमाणात बँकांकडून वाढीव कर्ज पदरात पाडून घेतले. असा प्रकार ते आणि त्यांची 'ट्रम्प ऑर्गनायझेशन' ही कंपनी २०१४ ते २०२१ या काळात सातत्याने करत राहिले.

# उद्यमी ट्रम्प यांचे फसवे 'उद्योग'!

या कालावधीत ट्रम्प यांच्या मत्तांचे मूल्य ८१ कोटी ते २०० कोटी डॉलर फुगवले गेले.यासाठी लेखापत्रांमध्ये फेरफार होत राहिले. या लबाडीवर नेमके बोट ठेवून, न्यूयॉर्कमधील एका न्यायालयाने ट्रम्प यांना आणि त्यांच्या पुत्रांना तसेच कंपनीला ३५.५ कोटी डॉलरचा दंड ठोठावला. याखेरीज जवळपास ८.६ कोटी डॉलर व्याजापोटी भरावे लागणार आहेत. म्हणजे एकूण ४४ कोटी डॉलर. गेल्याच महिन्यात ट्रम्प यांना आणखी एका प्रकरणात दंड ठोठावण्यात आला आहे. अनेक वर्षांपूर्वी ट्रम्प यांनी ई. जीन कॅरोल या महिलेचा लैंगिक छळ केल्याचा आरोप आहे. हा अनुभव आणि त्याविषयीची व्यथा कॅरोल यांनी पुस्तकरूपात मांडल्यानंतर ट्रम्प यांनी उलट कॅरोल यांचीच बदनामी सुरू केली. त्याबद्दल कॅरोल यांनी खटला दाखल केला आणि या प्रकरणी ट्रम्प यांना ८.८ कोटी डॉलरचा दंड झाला. त्यामुळे गेल्या काही आठवड्यांमध्ये ५० कोटींहून अधिक डॉलरचा दंड



ट्रम्प यांना झाला. दोन्ही दंड भरणे फार अवघड नाही, पण मुद्दा केवळ दंड भरण्याच्या आर्थिक क्षमतेचा नाही. न्यूयॉर्कच्या ज्या न्यायाधीशांनी फसवणुकीच्या प्रकरणात दंड ठोठावला, त्यांचे ट्रम्प यांच्याविषयी उद्गार उद्बोधक ठरतात – 'तुम्हाला कशाचाच पश्चात्ताप झाल्याचे दिसत नाही, जे जवळपास विकृतिनिदर्शक आहे!'बढाईखोरी हा ट्रम्प यांचा स्थायिभाव. बढाईखोरीशिवाय ट्रम्प यांना कशातच कशाचीही गती नाही. त्यामुळे संबंधित दंड भरण्यास त्यांना वरकरणी तरी काही आर्थिक अडचण होणार नसली, तरी प्रस्तुत मालमत्तेप्रमाणेच त्यांच्या इतरही मालमत्तांचे मूल्य फुगवलेले नसेलच, याची शाश्वती नाही. ट्रम्प यांची दंड भरण्याची कोणतीही इच्छा नाही. त्यामुळे संबंधित न्यायाधीश आर्थर ओन्गॉरॉन आणि हा खटला दाखल करणाऱ्या न्यूयॉर्क राज्याच्या ॲटर्नी जनरल लेटिशिया जेम्स या दोघांचेही त्यांनी वाभाडे काढले आणि त्यांच्या डेमोक्रॅटिक पार्श्वभूमीवर ताशेरे ओढले. वास्तविक अमेरिकी व्यवस्थेमध्ये न्यायाधीशांची राजकीय मते जाहीर आणि अध्याहृत असतात. पण केवळ दंड ठोठावून न्यायाधीश थांबले नाहीत. त्यांनी ट्रम्प आणि त्यांच्या दोन पुत्रांवर बंधनेही घालून दिली. ट्रम्प यांच्या मूळ कंपनीचे परिचालनच बदलण्याचा उद्देश या निकालातून दिसून येतो. ट्रम्प यांना पुढील तीन वर्षे न्यूयॉर्क राज्याच्या हद्दीमध्ये कोणत्याही कंपनीत संचालक म्हणून काम करता येणार नाही. दोन पुत्रांवर ही बंदी प्रत्येकी दोन वर्षांसाठी आहे. गतवर्षी कंपनीच्या व्यवहारांवर देखरेख ठेवण्यासाठी न्यायालयाकडून नियुक्त निरीक्षकांना वर्षे मुदतवाढ मिळाली आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# निरुपमही भाजपाच्या वाटेवर?

## काँग्रेसचे अनेक नेते इतर पक्षाच्या वाटेवर असल्याची शक्यता

। मुंबई । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**मिलिंद देवरा, बाबा सिद्दीकी आणि अशोक चव्हाण या तिन्ही नेत्यांनी काँग्रेसला रामराम ठोकत अनुक्रमे शिंदे गट, अजित पवार गट आणि भाजपात प्रवेश केला. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेससाठी धक्का मानला जात आहे. तसंच, काँग्रेसचे अनेक नेते इतर पक्षाच्या वाटेवर असल्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. काँग्रेसचे माजी खासदार संजय निरुपमही भाजपाच्या वाटेवर असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहेत. या चर्चांवर संजय निरुपम यांनी उत्तर दिलं आहे.**



काँग्रेसचे अनेक नेते काँग्रेस सोडून इतर पक्षात जात आहेत यामागची कारणं काय आहेत? असा प्रश्न संजय निरुपम यांना विचारण्यात आला होता. त्यावर ते म्हणाले, "यामागे अनेक कारणं आहेत. पण आता जाऊदे. परंतु, मी जात नाहीय." यावर तुम्हीही इतर पक्षात जात आहात, अशी चर्चा आहे, असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर संजय निरुपम म्हणाले, "मी इतर पक्षात जाणार असल्याच्या अफवा सुरू आहेत. एक व्यक्ती गेला की बाकी सर्वांबाबत अफवा पसरतात. आम्ही काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते आहोत. आम्ही जमिनीवर काम करणारे कार्यकर्ते आहोत. आणि यापुढेही काम करत राहणार आहोत", असं त्यांनी ठामपणे सांगितलं.दरम्यान, संजय निरुपम यांची मिलिंद देवरा, अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्याबरोबर चर्चा झाल्याची कुजबूज राजकीय वर्तुळात आहे. याबाबत ते म्हणाले, "माझी कोणाबरोबरच चर्चा झाली नाही. मी चॅलेंज देतो की माझी कोणाबरोबरच चर्चा झाली नाही. अफवा पसरवू नका."शिवसेनेकडून मुंबईत चार मतदारसंघात दावा केला आहे. याबाबत संजय निरुपम म्हणाले, "शिवसेनेकडून चुकीचा प्रयत्न सुरू आहे. आतापर्यंत महाविकास आघाडीच्या तीन बैठका झाल्या आहेत. या बैठकीत अद्यापही जागावाटपाबाबत अंतिम निर्णय झालेला नाही. २२ तारखेला काँग्रेसची निवडणूक समितीची बैठक आहे. जोपर्यंत अंतिम निर्णय येत नाही, तोपर्यंत कोणत्याही पक्षाकडून दावा करणं चुकीचं आहे. हे कोणत्याही आघाडीच्या नियमांचं उल्लंघन आहे", असं म्हणत संजय निरुपम यांनी ठाकरे गटाला घरचा आहेर दिला आहे."संजय निरुपम यांनी ज्या उत्तर पश्चिम मुंबई लोकसभा मतदारसंघावर दावा केला आहे, तो शिवसेनेचा आहे. युतीच्या वाटपात तो भाजपाचा नाही, हे सर्वांत महत्त्वाचं. संजय निरुपम यांची पुन्हा खासदार होण्याची इच्छा पूर्ण होणार नाही. कारण, बिहारमधील एक बेरोजगार तरुण, जवाहरलाल नेहरू विद्यापीठात पत्रकारिता पूर्ण केली नाही. आणि मुंबईच्या वाट्याला आला नोकरी शोधायला आणि सामनामध्ये लागला. त्यामुळे बाळासाहेबांच्या जवळ गेला आणि खासदार झाला. त्यांच्याच सांगण्यामुळे कृत्य केले म्हणून राजीनामा दिला. आयुष्यात ते खासदार होणार नाहीत. ते काय एवढा मोठा नेता नाहीत. इलेक्टिव्ह मेरिट नाही की भाजपाने त्याला घ्यावं. भाजपा चांगल्या नेत्यांना घेत असतं. त्याला काँग्रेसमधून आता संधी नाही. उत्तर पश्चिममधून २०१९ ला मी त्याला पावणे तीन लाखांनी हरवलं होतं. कोणत्याही पक्षाकडून त्याने तिकिट मिळवून दाखवावं. रिंगणात यावं. यावेळी मी त्याला साडेतीन लाखांनी हरवणार", असं आव्हानच गजानन कीर्तिकर यांनी दिलं आहे.

### 22 तारखेला काँग्रेसची निवडणूक

» काँग्रेसचे अनेक नेते काँग्रेस सोडून इतर पक्षात जात आहेत यामागची कारणं काय आहेत? असा प्रश्न संजय निरुपम यांना विचारण्यात आला होता. त्यावर ते म्हणाले, "यामागे अनेक कारणं आहेत. पण आता जाऊदे. परंतु, मी जात नाहीय." यावर तुम्हीही इतर पक्षात जात आहात, अशी चर्चा आहे, असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर संजय निरुपम म्हणाले, "मी इतर पक्षात जाणार असल्याच्या अफवा सुरू आहेत. एक व्यक्ती गेला की बाकी सर्वांबाबत अफवा पसरतात. आम्ही काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते आहोत. आम्ही जमिनीवर काम करणारे कार्यकर्ते आहोत. आणि यापुढेही काम करत राहणार आहोत", असं त्यांनी ठामपणे सांगितलं.दरम्यान, संजय निरुपम यांची मिलिंद देवरा, अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्याबरोबर चर्चा झाल्याची कुजबूज राजकीय वर्तुळात आहे. याबाबत ते म्हणाले, "माझी कोणाबरोबरच चर्चा झाली नाही. मी चॅलेंज देतो की माझी कोणाबरोबरच चर्चा झाली नाही. अफवा पसरवू नका."शिवसेनेकडून मुंबईत चार मतदारसंघात दावा केला आहे. याबाबत संजय निरुपम म्हणाले, "शिवसेनेकडून चुकीचा प्रयत्न सुरू आहे. आतापर्यंत महाविकास आघाडीच्या तीन बैठका झाल्या आहेत. या बैठकीत अद्यापही जागावाटपाबाबत अंतिम निर्णय झालेला नाही. २२ तारखेला काँग्रेसची निवडणूक समितीची बैठक आहे. जोपर्यंत अंतिम निर्णय येत नाही, तोपर्यंत कोणत्याही पक्षाकडून दावा करणं चुकीचं आहे.

# उद्धव ठाकरेंना शिवसेना पक्ष चिन्ह पुन्हा मिळू शकतं!

## सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी व्यक्त केली शक्यता

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**केंद्रीय निवडणूक आयोगाने शिंदे गटच खरी शिवसेना असल्याचा निर्वाळा दिला होता. निवडणूक आयोगाच्या या निकालाविरोधात उद्धव ठाकरे यांनी सर्वोच्च न्यायालयाचे दार ठोठावले आहे. याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयात हे प्रकरण प्रलंबित असून येत्या नोव्हेंबरपर्यंत याचा निकाल लागण्याची शक्यता सर्वोच्च न्यायालयाचे वकिल सिद्धार्थ शिंदे यांनी व्यक्त केलीय.**



तसंच, शिवसेना पक्षनाव आणि धनुष्यबाण पक्षचिन्ह उद्धव ठाकरेंना पुन्हा मिळू शकतं, असाही विश्वास त्यांनी व्यक्त केलाय. उद्धव ठाकरेंना धनुष्यबाण आणि नाव मिळू शकतं का असा प्रश्न वकिल सिद्धार्थ शिंदे यांना विचारण्यात आला होता. त्यावर ते म्हणाले, आमदार आणि खासदार संख्येच्या बळावर शिवसेना पक्षनाव आणि धनुष्यबाण पक्षचिन्ह एकनाथ शिंदे गटाला केंद्रीय निवडणूक आयोगाने मागच्या वर्षी फेब्रुवारीत दिलं होतं. निवडणूक आयोगाच्या या निर्णयाविरोधात उद्धव ठाकरे सर्वोच्च न्यायालयात आले. सर्वोच्च न्यायालयाने या निर्णयावर स्थगिती दिली नाही. परंतु, पुढील आदेश येईपर्यंत उद्धव ठाकरेंना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे हे पक्षनाव आणि मशाल पक्षचिन्ह वापरण्याचे निर्देश दिले. परंतु, आता त्याला एक वर्ष झाले आहे. शिवसेना पक्षासंदर्भात आता फक्त युक्तीवाद राहिला आहे. १ मार्चला युक्तीवाद होणार आहे. त्यानंतर एक-दोन तारखा दिल्या जातील.

### ठाकरेंचे युक्तीवाद स्ट्राँग

» निवडणूक आयोगाविरोधात उद्धव ठाकरेंची केस स्ट्राँग आहे, असं वकिलांचंही म्हणणं आहे. त्यामुळे उद्धव ठाकरेंना पुन्हा शिवसेना पक्षनाव आणि धनुष्यबाण पक्षचिन्ह परत मिळू शकेल. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांच्यासमोर हे प्रकरण आहे. ते नोव्हेंबर २०२४ ला निवृत्त होणार आहेत. निवृत्तीआधी त्यांना त्यांच्यासमोरील प्रकरणे संपवायची असतात. त्यामुळे उद्धव ठाकरेंना पक्षचिन्ह आणि पक्षनाव पुन्हा मिळण्याची संधी आहे. कदाचित उलटाही निर्णय येऊ शकतो. पण ठाकरेंचे युक्तीवाद स्ट्राँग आहेत. त्यामुळे त्यांना ते मिळू शकतं. पक्ष आणि चिन्ह उद्धव ठाकरेंना मिळालं तर राज्यात राजकीय गणित काय असतील हे मी सांगू शकत नाही", असंही सिद्धार्थ शिंदे म्हणाले.

# आदिवासी लोकांमध्ये हिंमत नाही!

## तुम्ही राम मंदिरातील प्राणप्रतिष्ठा सोहळा पाहिला का?

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

“उच्च न्यायालयांमध्ये दलित, आदिवासी आणि मागासलेले लोक किती आहेत? हे सांगा. गप्प का राहिलात? हिंमत नाहीय तुमच्यात. उच्च न्यायालयाचे ६५० न्यायाधीश आहेत. तुमची लोकसंख्या ७३ टक्के आहे. ६ न्यायाधीश ७३ टक्के लोकांचे आहेत. मग नोकरशाहीत तुमचे किती लोक आहेत? असा प्रश्न राहुल गांधींनी विचारला. ते उत्तर प्रदेशमधील भारत डोडो न्याय यात्रेत बोलत होते. बिझनेस स्टॅण्डर्डने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.



राहुल गांधी यांनी काल राम मंदिराच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यावरूनही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधला होता. “राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळा म्हणजे उपेक्षित समाजाचं प्रतिनिधित्व नसलेला तमाशा आहे”, असं राहुल गांधी म्हणाले होते. “तुम्ही राम मंदिरातील प्राणप्रतिष्ठा सोहळा पाहिला का? तिथे एकच ओबीसी चेहरा होता का? अमिताभ बच्चन, ऐश्वर्या राय आणि नरेंद्र मोदी होते”, असं राहुल गांधी म्हणाले.ते म्हणाले, “देशाच्या एकूण लोकसंख्येच्या ७३ टक्के लोक या कार्यक्रमादरम्यान कुठेही दिसले नाहीत. त्यांनी देशाची सूत्रे हाती घ्यावीत असे भाजपाला कधीच वाटणार नाही.” देशातील सामाजिक विषमता उघड करण्यासाठी जात जनगणना करणं गरजेचं आहे, असं ते म्हणाले. “या देशात ७३ टक्के जातींकडे किती संपत्ती आहे? जातीची जनगणना हा देशाचा एक्स-रे आहे. यातून सर्व काही समोर येईल”, असेही ते पुढे म्हणाले.राहुल गांधी यांची भारत जोडो न्याय यात्रा आज (१९ फेब्रुवारी) त्यांचा माजी लोकसभा मतदारसंघ अमेठीत दाखल होणार आहे. याचवेळी केंद्रीय मंत्री स्मृती इराणीही येथे दौऱ्यावर येणार आहेत. २०१९ नंतर दोन्ही नेते एकाच वेळी अमेठीमध्ये उपस्थित राहण्याची ही दुसरी घटना आहे, याआधी २०२२ मध्ये हे दोन्ही एकत्र निवडणूक प्रचाराकरता एकत्र दिसले होते.२२ जानेवारीच्या दिवशी राम मंदिरात राम मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली. या सोहळ्याला रामभक्तांची आणि अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. तसंच लाखो लोकांनी हा सोहळा लाईव्हही पाहिला. या कार्यक्रमाला सोनिया गांधी आणि मल्लिकार्जुन खरगे यांना निमंत्रण पाठवण्यात आलं होतं. मात्र हा भाजपाचा कार्यक्रम आहे असं म्हणत त्यांनी यावर बहिष्कार घातला. याबाबत आता काँग्रेस नेते राहुल गांधी यांचीही प्रतिक्रिया समोर आली आहे.देशात ‘राम लहर’ अर्थात रामभक्तीची लाट आली आहे. त्यासाठी तुम्ही कसे तयार आहात असं विचारलं असता, राहुल गांधी यांनी “रामभक्तीची लाट वगैरे काहीही नाही प्राणप्रतिष्ठा सोहळा म्हणजे नरेंद्र मोदींचा शो होता. नरेंद्र मोदी यांनी फंक्शन केलं. ते सगळं ठीक आहे. आमच्याकडे देशाला बळ देणाऱ्या पाच योजना आहेत. आम्ही त्या लोकांसमोर ठेवतो आहोत.” असं उत्तर दिलं आहे. केंद्रीय मंत्री स्मृती इराणी आणि काँग्रेस नेते राहुल गांधी हे दोघेही आज अमेठीत आहेत. अमेठी हा काँग्रेसचा पारंपारिक मतदारसंघ होता मात्र २०१९ च्या निवडणुकीत स्मृती इराणी या मतदारसंघातून उभ्या राहिल्या आणि त्यांनी राहुल गांधींना हरवलं. राहुल गांधी या जागेवरुन तीनवेळा खासदार झाले होते. तर सोनिया गांधीही याच जागेवरुन खासदार झाल्या होत्या. मात्र हा मतदारसंघ त्यांच्याकडून हिरावण्याचं काम स्मृती इराणींनी करुन दाखवलं.त्यानंतर आता राहुल गांधी स्मृती ईराणी हे दोघेही आज अमेठीत आहेत.स्मृती इराणी या एका कार्यक्रमासाठी अमेठीत पोहचणार आहेत. तर राहुल गांधी यांची भारत जोडो न्याय यात्रा आज अमेठीत दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास पोहचणार आहे. दीर्घकाळाने हे दोन नेते अमेठीत असणार आहेत. मात्र या दोघांचा आमना-सामना थेट होणार नाही. याचं महत्त्वाचं कारण म्हणजे दोघांच्याही दौऱ्याचे मार्ग वेगवेगळे आहेत.२०१९ च्या पराभवानंतर राहुल गांधी क्वचितच अमेठीला येतात. मात्र स्मृती इराणी या अनेकदा अमेठीत येऊन गेल्या आहेत. आजही त्या अमेठीत असणार आहेत. त्याचप्रमाणे राहुल गांधीही असणार आहेत. स्मृती इराणी या चार दिवसांच्या अमेठी दौऱ्यावर आहेत. स्थानिक लोकांना त्या भेटणार आहेत.

### राहुल - स्मृती दोघेही आज अमेठीत

केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांनी अमेठीतल्या गौरीगंज भागात मेदन मेवई या ठिकाणी घर बांधलं आहे. २२ फेब्रुवारीला वास्तूशांत पूजा असणार आहे. सकाळी १० वाजता पूजा सुरु होईल आणि त्यानंतर निमंत्रितांसाठी भोजनाची व्यवस्थाही करण्यात आली आहे. स्मृती इराणी यांनी २०१९ ची लोकसभा निवडणूक अमेठीतून जिंकली होती. त्यानंतर त्यांनी आपण इथे घर बांधणार असल्याचं आश्वासन अमेठीच्या लोकांना दिलं होतं. त्यानुसार ते आश्वासन त्यांनी पूर्ण केलं आहे. लोकांना दिलेलं आश्वासन हा एकच उद्देश स्मृती इराणींचा नाही. त्या घर बांधून हा संदेशही देऊ इच्छितात की राहुल गांधी यांना अमेठीच्या लोकांशी काही घेणंदेणं नाही फक्त मतांसाठीच ते इथे येतात.अमेठी हा काँग्रेसचा पारंपारिक मतदारसंघ होता मात्र २०१९ च्या निवडणुकीत स्मृती इराणी या मतदारसंघातून उभ्या राहिल्या आणि त्यांनी राहुल गांधींना हरवलं. राहुल गांधी या जागेवरुन तीनवेळा खासदार झाले होते. तर सोनिया गांधीही याच जागेवरुन खासदार झाल्या होत्या. मात्र हा मतदारसंघ त्यांच्याकडून हिरावण्याचं काम स्मृती इराणींनी करुन दाखवलं.त्यानंतर आता राहुल गांधी स्मृती ईराणी हे दोघेही आज अमेठीत आहेत.

# भाजपा खासदाराला सर्वोच्च न्यायालयाचा दणका

## लोकसभा विशेषाधिकार समितीच्या आदेशांना स्थगिती

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

बंगालमधील संदेशखली भागातील हिंसाचार आणि त्याअनुषंगाने स्थानिक प्रशासनाकडून केला जाणारा तपास यावर मोठी चर्चा पाहायला मिळत आहे. संदेशखली हिंसाचाराच्या घटनेनंतर पोलिसांनी संचारबंदी लागू केलेली असतानाही भाजपा खासदार व त्यांचे समर्थक यांनी संबंधित भागात एकत्र जमून आदेशांचं उल्लंघन केल्याचा प्रकार समोर आला होता.

पोलिसांनी यासंदर्भात गुन्हा दाखल केल्यानंतर त्यावरून मोठा राजकीय वाद निर्माण झाल्याचं पाहायला मिळालं. हे प्रकरण थेट सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहोचल्यावर न्यायालयाने आज यासंदर्भात भाजपा खासदारांविरोधात निकाल दिला आहे. भाजपाचे पश्चिम बंगालचे खासदार डॉ. सुकांता मुजुमदार यांनी लोकसभा विशेषाधिकार समितीकडे एक तक्रार दाखल केली होती. संदेशखली भागात संचारबंदी असताना एकत्र जमल्याप्रकरणी स्थानिक प्रशासनाने केलेल्या




कारवाईविरोधात त्यांनी तक्रार दाखल केली होती. यावेळी आपल्याला मारहाण झाल्याचाही दावा मुजुमदार यांनी केला होता. मुजुमदार यांच्या तक्रारीवरून लोकसभेच्या विशेषाधिकार समितीनं पश्चिम बंगालचे मुख्य सचिव भगवती प्रसाद गोपालिका, नॉर्थ २४ परगणा जिल्ह्याचे जिल्हाधिकारकी शरद कुमार द्विवेदी, पश्चिम बंगालचे पोलीस महासंचालक राजीव कुमार, नॉर्थ २४ परगणा जिल्ह्यातील बसिरहाट भागाचे पोलीस अधीक्षक डॉ. हुसेन मेहदी रेहमान व बसिरहाटचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक पार्थ घोष यांना नोटीस बजावली होती.दरम्यान, भाजपा खासदार सुकांता मुजुमदार यांनी केलेल्या तक्रारीविरोधात या सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली.

### कपिल सिब्बल यांचा युक्तिवाद

सोमवारी सकाळी १०.३० वाजता त्यांना विशेषाधिकार समितीसमोर हजर राहण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यामुळे त्याआधी या याचिकेवर सुनावणी व्हावी, अशी विनंती या अधिकाऱ्यांची बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल व अभिषेक मनू सिंघवी यांनी केली. त्यावर सर्वोच्च न्यायालयाने ही तातडीची सुनावणी घेऊन लोकसभा विशेषाधिकार समितीच्या कारवाईला स्थगिती देण्याचे अंतरिम आदेश दिले.जेव्हा त्यांना संसदेचे सदस्य म्हणून जबाबदारी पार पाडण्यापासून वंचित ठेवण्यात आलं असेल. कोणतीही संसदीय जबाबदारी पार पाडत नसेल, तर खासदाराला विशेषाधिकारांचं संरक्षण मिळू शकत नाही.

# घटस्फोटाच्या घोषणेनंतर ईशा देओल पहिल्यांदाच माध्यमांसमोर

ईशा देओल बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक आहे. आपल्या अभिनयाच्या जोरावर ईशाने प्रेक्षकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले आहे. सध्या ईशा अभिनयापासून लांब असली तरी सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात सक्रिय असते. निरनिराळे फोटो व व्हिडीओ शेअर करत ती चाहत्यांना अपडेट देत असते. अभिनयाव्यतिरिक्त ईशा आपल्या वैयक्तिक आयुष्यामुळेही अनेकदा चर्चेत असते. लग्नाच्या ११ वर्षांनंतर ईशा पती भरत तख्तानीबरोबर घटस्फोट घेणार आहे. काही दिवसांपूर्वी दिल्ली टाईम्सला दिलेल्या मुलाखतीत ईशाने याबाबत घोषणा केली होती.



ईशाच्या या वक्तव्यानंतर अनेक चर्चांना उधाण आले आहे. दरम्यान, घटस्फोटाच्या घोषणेनंतर ईशा पहिल्यांदाच माध्यमांसमोर आली. अभिनेता जॅकी भगनानी व अभिनेत्री रकुल प्रीत सिंग यांच्या लग्नासाठी ईशा गोव्याला गेली आहे. मुंबई विमानतळावर ईशाला बघताच पापाराझींनी फोटो व व्हिडीओ घेण्यासाठी एकच गर्दी केली होती. यावेळी ईशाने पांढऱ्या रंगाचा क्रॉप टॉप व जीन्स परिधान केली होती, तर डोक्यावर पांढऱ्या रंगाची गोल टोपी घातली होती. पापाराझींनी तिला कशी आहेस, असा प्रश्नही विचारला. यावर ईशाने मी ठीक आहे असे उत्तर दिले. ईशाचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आहे. अनेक चाहत्यांनी यावर कमेंट केल्या आहेत.

# सिद्धार्थच्या बहुचर्चित 'योद्धा'चा टीझर प्रदर्शित

बॉलिवूड अभिनेता सिद्धार्थ मल्होत्राच्या 'योद्धा' या चित्रपटाचा टीझर नुकताच प्रदर्शित झाला आहे ज्याची चाहते फारच आतुरतेने वाट बघत होते. या टीझरच्या आधी चित्रपटाचे पोस्टर एका हटके पद्धतीने प्रदर्शित करण्यात आले होते. १३००० फूट उंचीवर हवेत या चित्रपटाचे पोस्टर फडकवत याच्या टीझरची घोषणाही करण्यात आली होती. याची सोशल मीडियावर बरीच चर्चा झाली. पोस्टर लॉंच करण्यासाठी चित्रपटाची संपूर्ण टीम दुबईमध्ये स्कायडायव्हिंग करताना पाहायला मिळाली. नुकताच या चित्रपटाचा टीझर प्रदर्शित झाला असून या छोट्याश्या टीझरमध्ये बराच थरार अनुभवायला मिळत आहे. एक विमान हायजॅक होतं अन् मग त्यांच्या बचावाच्या मोहिमेवर सिद्धार्थ मल्होत्राला पाठवण्यात येतं जो भारतीय सैन्यातील एक अधिकारी दाखवला आहे. असा अंदाज टीझर पाहून लावला जात आहे. चित्रपटाच्या कथेबद्दल फारशी माहिती समोर आलेली नसून केवळ एका रेस्क्यू मिशनवर हा चित्रपट बेतला असल्याचं याच्या टीझरवरुन स्पष्ट होत आहे. सिद्धार्थबरोबरच या चित्रपटात राशी खन्ना व दिशा पटानी या अभिनेत्रीही महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत. त्यांचीही एक छोटीशी झलक या टीझरमध्ये आपल्याला पाहायला मिळत आहे. प्रेक्षकांना हा टीझर प्रचंड आवडला आहे. अखेर ३ वर्षांनी हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. मध्यंतरी हा चित्रपट २०२३ च्या अखेरीस प्रदर्शित होणार असल्याचं समोर आलं होतं पण पुन्हा तो लांबणीवर पडला.

# अभिनयात उत्तम कोण अभिषेक की ऐश्वर्या?



कपूर कुटुंबियांपाठोपाठ बच्चन कुटुंबीय यांची सर्वत्र चर्चा आपल्याला पाहायला मिळते. यातील अभिषेक बच्चन व ऐश्वर्या राज बच्चन या जोडप्याच्या विभक्त होण्याच्या बऱ्याच बातम्या गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर व्हायरल होत होत्या. यावर अद्याप ऐश्वर्या व अभिषेक यांनी कोणतंही वक्तव्य केलं नसलं तरी आपल्या सोशल मीडिया पोस्टमधून या बातम्या किती खोट्या आहेत हे सिद्ध केलं आहे. अशातच आता अभिषेकची बहिण श्वेता बच्चनचं एक जुनं वक्तव्य समोर येत आहे. महानायक अमिताभ बच्चन यांच्या दोन मुलांपैकी अभिषेकने अभिनयात नशीब आजमावलं अन् स्वतःचं असं वेगळं स्थान निर्माण केलं तर श्वेता बच्चन नंदा ही एक उत्तम लेखिका आहे. श्वेता सोशल मीडियावर खूप सक्रिय असते. बच्चन कुटुंबियांची नात नव्या नवेली नंदा हीच्या 'व्हॉट द हेल नव्या' या पॉडकास्टमध्ये नुकतीच श्वेता बच्चन नंदा व जया बच्चन या मायलेकीने हजेरी लावली अन् मोनमोकळ्या गप्पाही मारल्या. परंतु सध्या सोशल मीडियावर व्हायरल होणारा श्वेता बच्चनचा व्हिडीओ हा तसा जुना आहे. २०१९ साली प्रसिद्ध निर्माता व दिग्दर्शक करण जोहरच्या 'कॉफी विथ करण' या चॅटशोवर श्वेता आणि अभिषेक यांनी हजेरी लावली होती. त्यावेळी रॅपिड फायर राऊंडदरम्यान करणने श्वेताला एक फारच अडचणीचा प्रश्न विचारला अन् श्वेताने तेव्हा क्षणाचाही विलंब न करता त्या प्रश्नाचं उत्तर दिलं होतं. करण जोहरने त्यावेळी प्रश्न विचारला, "तुझ्यामते सर्वात उत्तम अभिनेता कोण? अभिषेक की ऐश्वर्या?" तेव्हा जराही विलंब न करता या प्रश्नाचं उत्तर श्वेताने दिलं .



# 'बडे मियाँ छोटे मियाँ'चे टायटल ट्रॅक प्रदर्शित

डेव्हिड धवन दिग्दर्शित 'बडे मियाँ छोटे मियाँ' चित्रपट १९९८ साली प्रदर्शित झाला होता. या चित्रपटात अमिताभ बच्चन व गोविंदा यांची प्रमुख भूमिका होती. बॉक्स ऑफिसवर या चित्रपटाने चांगली कमाई केली होती. आता लवकरच या चित्रपटाचा रिमेक प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात अक्षय कुमार व टायगर श्रॉफची प्रमुख भूमिका आहे. नुकताच या चित्रपटाचा टायटल ट्रॅक प्रदर्शित झाला. या गाण्यामध्ये अक्षय व टायगरने जबरदस्त डान्स केला आहे. प्रेक्षकांकडून या गाण्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे. हे गाणे बघून चाहत्यांना अमिताभ व गोविंदाच्या 'बडे मियाँ छोटे मियाँ'ची आठवण येत आहे. या गाण्यात १०० हून अधिक डान्सरचा सहभाग आहे. हे गाणे बॉस्को-सीझरने कोरिओग्राफ केले आहे, तर अनिरुद्ध रविचंदर आणि विशाल मिश्रा यांनी गायले आहे. गाण्याचे बोल इर्शाद कामिल यांनी लिहिले आहेत. हे गाणे डेहराडूनमध्ये शूट करण्यात आले आहे. 'बडे मियाँ छोटे मियाँ' चित्रपटाचे दिग्दर्शन अली अब्बास जफर यांनी केले आहे. जफर, जॅकी भगनानी, वाशु भगनानी, दीपशिखा देशमुख आणि हिमांशू किशन मेहरा यांनी पूजा एंटरटेनमेंट आणि एएझेड फिल्म्सच्या बॅनरखाली या चित्रपटाची निर्मिती केली आहे.

# राजकोटमध्ये 'यशस्वी'चे द्विशतक!

## » मी माझ्या कारकिर्दीत इतके षटकार मारले नाहीत

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**भारत आणि इंग्लंड यांच्यातील मालिकेतील तिसरा कसोटी सामना राजकोट येथे खेळला गेला. या सामन्याच्या चौथ्या दिवशी यशस्वी नावाचे वादळ आल्यासारखे वाटत होते. या २२ वर्षीय भारतीय सलामीवीराने दमदार फलंदाजी करताना इंग्लंविरुद्ध षटकारांचा पाऊस पाडला. आपल्या कसोटी कारकिर्दीतील केवळ सातवा सामना खेळणाऱ्या युवा यशस्वीने आपले दुसरे द्विशतक पूर्ण केले. यशस्वीच्या या खेळीचा माजी कर्णधार ॲलिस्टर कुकने कौतुक केले आहे.**



ॲलिस्टर कूकने यशस्वी जैस्वालचे कौतुक करताना त्याच्या संपूर्ण कसोटी कारकिर्दीची तुलना राजकोट कसोटीतील भारतीय सलामीवीराच्या स्फोटक खेळीशी केली. इंग्लंडसाठी सर्वाधिक कसोटी धावा करणारा हा अनुभवी खेळाडू यशस्वीबद्दल म्हणाला, 'माझ्या संपूर्ण कारकिर्दीत मी जितके षटकार मारले नाहीत, तितके षटकार यशस्वी जैस्वालने एका डावात मारले.' कूकने २०१८ मध्ये आपल्या १२ वर्षांच्या दीर्घ कसोटी कारकिर्दीला अलविदा म्हटले. १६१ कसोटी सामन्यांमध्ये कुकने ११ षटकारांसह ४६.९५ च्या सरासरीने १२,४७२ धावा केल्या. त्याचवेळी, यशस्वीने राजकोट कसोटीच्या दुसऱ्या डावात १२ षटकार ठोकले. यशस्वीने राजकोटमध्ये द्विशतक पूर्ण करताच अनेक मोठे विक्रम मोडीत काढले. सलग दोन कसोटी सामन्यांमधील हे त्याचे दुसरे द्विशतक ठरले. यासह ही कामगिरी करणारा तो विनोद कांबळी आणि विराट कोहली यांच्यानंतरचा तिसरा भारतीय ठरला आहे. या इनिंगमध्ये यशस्वीने १२ विक्रमी षटकार ठोकले. तसेच १४ चौकारांचाही समावेश होता. या मालिकेत यशस्वीने आतापर्यंत २२ षटकार मारले आहेत. कसोटी मालिकेत भारतीयाकडून सर्वाधिक षटकार मारण्याच्या बाबतीत त्याने रोहित शर्माला मागे सोडले. रोहित शर्माच्या नावावर एका मालिकेत १९ षटकारांचा विक्रम होता.यशस्वी जैस्वालने द्विशतकादरम्यान इंग्लंडचा सर्वात गोलंदाज जेम्स अँडरसनच्या एका षटकात सलग तीन षटकार ठोकले. राजकोट कसोटीच्या तिसऱ्या दिवशी यशस्वीने पहिला षटकार लेग साइडला, दुसरा ऑफ साइडला आणि तिसरा गोलंदाजाच्या डोक्यावरून स्ट्रेटला मारला. मात्र, तिसऱ्या दिवशी शतक पूर्ण केल्यानंतर तो रिटायर्ड हर्ट झाला. पाठीच्या समस्येमुळे तो मैदानाबाहेर गेला, मात्र चौथ्या दिवशी तो मैदानात आला तेव्हा त्याने नाबाद द्विशतक झळकावून सर्वांना प्रभावित केले.' कूकने २०१८ मध्ये आपल्या १२ वर्षांच्या दीर्घ कसोटी कारकिर्दीला अलविदा म्हटले. १६१ कसोटी सामन्यांमध्ये कुकने ११ षटकारांसह ४६.९५ च्या सरासरीने १२,४७२ धावा केल्या. त्याचवेळी, यशस्वीने राजकोट कसोटीच्या दुसऱ्या डावात १२ षटकार ठोकले. यशस्वीने राजकोटमध्ये द्विशतक पूर्ण करताच अनेक मोठे विक्रम मोडीत काढले. सलग दोन कसोटी सामन्यांमधील हे त्याचे दुसरे द्विशतक ठरले. यासह ही कामगिरी करणारा तो विनोद कांबळी आणि विराट कोहली यांच्यानंतरचा तिसरा भारतीय ठरला आहे. या इनिंगमध्ये यशस्वीने १२ विक्रमी षटकार ठोकले. तसेच १४ चौकारांचाही समावेश होता. या मालिकेत यशस्वीने आतापर्यंत २२ षटकार मारले आहेत. भारत आणि इंग्लंड यांच्यातील मालिकेतील तिसरा कसोटी सामना राजकोट येथे खेळला गेला. या सामन्याच्या चौथ्या दिवशी यशस्वी नावाचे वादळ आल्यासारखे वाटत होते. या २२ वर्षीय भारतीय सलामीवीराने दमदार फलंदाजी करताना इंग्लंविरुद्ध षटकारांचा पाऊस पाडला. आपल्या कसोटी कारकिर्दीतील केवळ सातवा सामना खेळणाऱ्या युवा यशस्वीने आपले दुसरे द्विशतक पूर्ण केले. यशस्वीच्या या खेळीचा माजी कर्णधार ॲलिस्टर कुकने कौतुक केले आहे.

### अनेक मोठे विक्रम मोडीत काढले

» ॲलिस्टर कूकने यशस्वी जैस्वालचे कौतुक करताना त्याच्या संपूर्ण कसोटी कारकिर्दीची तुलना राजकोट कसोटीतील भारतीय सलामीवीराच्या स्फोटक खेळीशी केली. इंग्लंडसाठी सर्वाधिक कसोटी धावा करणारा हा अनुभवी खेळाडू यशस्वीबद्दल म्हणाला, 'माझ्या संपूर्ण कारकिर्दीत मी जितके षटकार मारले नाहीत, तितके षटकार यशस्वी जैस्वालने एका डावात मारले.' कूकने २०१८ मध्ये आपल्या १२ वर्षांच्या दीर्घ कसोटी कारकिर्दीला अलविदा म्हटले. यशस्वीने राजकोट कसोटीच्या दुसऱ्या डावात १२ षटकार ठोकले.यशस्वीने राजकोटमध्ये द्विशतक पूर्ण करताच अनेक मोठे विक्रम मोडीत काढले.

# भारताकडून धुळदाण होताच स्टोक्सचा अंपायरिंगवर सवाल

## » भारताने इंग्लंडचा धुव्वा उडवत कसोटीमधील सर्वात विजय मिळवला

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि इंग्लंड दरम्यान, सध्या 5 सामन्यांची मालिका सुरु आहे. मालिकेतील तिसऱ्या सामन्यात भारताने इंग्लंडचा 434 धावांनी धुव्वा उडवत कसोटी क्रिकेटमधील सर्वात मोठा विजय मिळवला. राजकोटच्या मैदानावर खेळवण्यात आलेल्या सामन्यात भारताने इंग्लंडसमोर 557 धावांचे आव्हान ठेवले होते. भारताने दिलेल्या आव्हानाच पाठलाग करताना इंग्लंडचा संघ 122 धावाच करु शकला. रवींद्र जाडेजा 5 विकेट्स पटकावत साहेबांना गुंडाळले.**



मालिकेतील चौथा सामना 23 फेब्रुवारीला सुरु होईल. हा सामना रांचीच्या मैदानावर खेळवण्यात येणार आहे. भारताकडून धुळदाण होताच बेन स्टोक्सने अंपायरिंगवर काही सवाल उपस्थित केले आहेत. बेन स्टोक्स म्हणाला, राजकोट कसोटीमध्ये डीआरएसच्या टेक्निकमध्ये कमी असल्यामुळे तीन निर्णय आमच्याविरोधात गेले. शिवाय, इंटरनॅशनल क्रिकेटमधून अंपायर्स कॉलचा नियम रद्द करण्याची मागणीही स्टोक्सने केली आहे. पुढे बोलताना स्टोक्स म्हणाला, "आमची या सामन्यात तीन अंपायर्स कॉल वेळी अपील चुकीची ठरली. अंपायर्स कॉल डीआरएसचा हिस्सा आहे. एकतर तुमची अपील चुकीची असू शकते किंवा बरोबर..मी असे म्हणत नाही की, आमचा त्यामुळे पराभव झाला. 500 धावा खूप जास्त असतात. इंग्लंडच्या दुसऱ्या डावात जॅक फ्रॅकली पायचीत झाला. जसप्रीत बुमराहने त्याला बाद केले. जॅकच्या अंपायरने पायचीत दिल्यामुळेच बेनस्टोकने नाराजी व्यक्त केली. चेंडू लेग स्टंपला चाटून जात होता. त्यामुळे त्याला बाद देण्यात आले होते. जर अंपायरने त्याला नॉट आऊट दिले असते तर तो बाद झाला नसता. अंपायर्स कॉल जॅक फ्रॅकलीला लागू झाला. पराभव झाल्यामुळे नाही तर खरच सिस्टिममध्ये बदल करण्याची गरज असल्याचे बेन स्टोक्स म्हणालाय.

### चौथा सामना 23 फेब्रुवारीला

» पहिल्या डावात देखील ओली पोपला बाद घोषित केल्याने साहेबांचा संघ नाराज झाला होता. मात्र, टीमने डीआरएस घेताच निर्णय बदलण्यात आला. भारत आणि इंग्लंड दरम्यान, सध्या 5 सामन्यांची मालिका सुरु आहे. मालिकेतील तिसऱ्या सामन्यात भारताने इंग्लंडचा 434 धावांनी धुव्वा उडवत कसोटी क्रिकेटमधील सर्वात मोठा विजय मिळवला. राजकोटच्या मैदानावर खेळवण्यात आलेल्या सामन्यात भारताने इंग्लंडसमोर 557 धावांचे आव्हान ठेवले होते. भारताने दिलेल्या आव्हानाच पाठलाग करताना इंग्लंडचा संघ 122 धावाच करु शकला. रवींद्र जाडेजा 5 विकेट्स पटकावत साहेबांना गुंडाळले. मालिकेतील चौथा सामना 23 फेब्रुवारीला सुरु होईल. हा सामना रांचीच्या मैदानावर खेळवण्यात येणार आहे.